# पद्मश्री पुरस्कार प्राप्त


# कविवर्य बाळकृष्ण भगवंत बोरकर

सुचेता नलावडे



जन्म-३० नोव्हेंबर,१९१०

मृत्यू-०८ जुलै १९८४


प्रियकामा
चैत्रपुनव
बा.भ.बोरकर
बा. भ. बोरकर
रमलरात्रीत रंगलेले
बोरकर
आ नं द भै र वी

# साहित्य संपदा

१) १९३३-मडगाव येथील मराठी साहित्य संमेलनात प्रतिभा या त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहाचे प्रकाशन.

२) १९३४-बडोद्यातील वाड्.मय परिषदेच्या अधिवेशनात ' तेथे कर माझे जुळती ' या काव्यगायनाने कवी म्हणून ख्याती.

३) अनेक कवितासंग्रह प्रसिध्द-
उदा-अनुरागिणी, आनंदभैरवी, गितार, चित्रवीणा, चैत्रपुनव इत्यादी.

४) काव्येतर साहित्यनिर्मिती-
६ अनुवाद, २ कथासंग्रह, ४ कादंबऱ्या, १० कोकणी साहित्यकृती,
४ ललितलेखसंग्रह, काही चरित्रात्मक प्रबंध, संपादित कवितासंग्रह

# आनंदयात्री बा.भ. बोरकर (बाकीबाब बोरकर)

## पुरस्कार

१) १९६७-शासनाकडून ' पद्मश्री ' पुरस्कार प्राप्त.

२) १९८१- मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार त्यांच्या ' सासाय '- या कोकणी भाषेतील कवितासंग्रहाला मिळाला.

३) गोवामुक्ती आंदोलनातील योगदानासाठी ' ताम्रपट ' प्रदान.

# बोरकर व त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये

१) बाळकृष्ण भगवंत बोरकर-सौंदर्यवादी कवी.

२) गोमंतक भूषण कवी बोरकर-कवितेची स्थिर केंद्रे-निसर्ग व प्रेम.

३) निसर्गाशी तादात्म्य तसेच सूक्ष्म निरीक्षणशक्ती असलेले कविवर्य बोरकर.

४) साहित्यात रंग, शब्दचित्रे उत्तमरित्या साकारली.

५) नादलुब्धता हा एक उल्लेखनीय विशेष.

६) बोरकरांची जडणघडण गोव्यासारख्या शांत, समृध्द ठिकाणी झाली तसेच यामध्ये निसर्ग, संस्कृती, घर-परिसरातले अध्यात्मप्रवण वातावरण, पौर्वात्य तत्त्वविचारांची ओळख करुन देणारे नवे-जुने वाङ्.मय आणि त्यांची स्वत:ची विशिष्ट अशी भावप्रकृती या सर्वांचा सहयोग आहे.

७) वागीश्वरीच्या दालनातील ह्या कवीला उद्देशून राजकवी भा.रा.तांबे यांनी खालील उद्‌गार काढले-

"Here is a new star on horisen."

८) मराठीतील असो वा कोकणीतील असो, अनुवाद, भाषांतर कोणतेही साहित्य असो सर्वत्र एका ' आनंदघना ' सारखा त्यांचा विहार दिसतो.



# रे थांब जरा आषाढघना

बाळकृष्ण भगवंत बोरकर



## काव्यवैशिष्ट्ये

१) ‘चैत्रपुनव’-(१९७०-मौज प्रकाशन)-
कवितासंग्रहातील २६ ओळींची ही कविता-

२) या कवितेत पादाकुलक वृत्त व यमक अलंकार दिसून येतो.

३) ऋतुचक्र तसेच भारतीय महिन्यातील ' आषाढ ' मासाचा यथार्थ उपयोग.

४) अनेक शब्दप्रतिमा व रंगांची उधळण.

५) अनुस्वारांची किमया दिसते.

६) शांत, समृध्द अशा गोव्यातील खास शब्द-जसे १.हळदुव्या,२.कणस,३.पिसोळी

७) आषाढघनाला कवी संबोधत आहेत- ' रे ' जणू एखाद्या सख्याशी संवाद साधावा तसे. गोव्याच्या हया सुपुत्राला कलात्मकतेचा वारसा लाभलेला आहे. आषाढातील हे सर्व विलोभनीय निसर्गसौंदर्य कवीला पाहण्यासाठी आषाढातील ह्या घनाने ' जरा ' थांबावे असे प्रेमाने ते सांगत आहेत.


ह्या संपूर्ण कवितेत बोरकरांनी आपल्या लेखणीने जणू शब्दांचे इंद्रधनु साकारले आहे.




विशेषण व विशेष्य यांचाही अधूनमधून वापर-जसे-

हळदुव्या उन्हा

मधु गानाने





# पादाकुलक वृत्त

' रे थांब जरा आषाढघना ' हया कवितेत ' पादाकुलक ' हे मात्रावृत्त आलेले आहे. ह्याच्या प्रत्येक चरणात १६ मात्रा असून ८ व ८ मात्रांची अशी पद्माची दोन आवर्तने येतात.  ही पद्मावर्तनी समजाती आहे. कवितेत एक प्रकारची गेयता आढळते.

उदा- को म ल पा चूं ची ही शे तें
२ १ १ २ २ २ २ २ २

प्र वा ळ मा ती म ध लीं औ तें
१ २ १ २ २ १ १ २ २ २

नित्य परिचयातील उदाहरण-

बालकवींची ' फुलराणी ' कविता बघा.


हिरवे हिरवे गार गालिचे
हरित तृणाच्या मखमालीचे
त्या सुंदर मखमालीवरती
फु ल रा णी ही | खे ळ त हो ती
१ १ २ २ २ | २ २ २ १ १
प प

पादाकुलक-
मात्रा १६
८+८
प | प

# कृती संच-१

कृती १) सूचनेनुसार कृती सोडवा.

१) या कवितेत आलेल्या रत्नांची नावे लिहा



२) सूर्यासाठी वापरलेला शब्द →

## रे थांब जरा आषाढघना

रे थांब जरा आषाढघना
बघुं दे दिठि भरुन तुझी करुणा
कोमल पाचूंची हीं शेतें
प्रवाळमातीमधलीं औतें
इंद्रनीळ वेळूंचीं बेटें
या तुझ्याच पदविन्यासखुणा

रोमांचित ही गंध-केतकी
फुटे फुलीं ही सोनचंपकी
लाजुन या जाईच्या लेकी
तुज चोरुन बघती पुन्हापुन्हा
उघड गगन, कर घडिभर आसर
आणि खुलें कर वासरमणि-घर
वाहूं दे या तव किमयेवर
कोवळया नव्या हळदुव्या उन्हा

कृती २) स्वमत-

या कवितेत तुम्हांला जाणवलेले निसर्गसौंदर्य १० ते १२ ओळींत लिहा.

कृती ३) काव्यसौंदर्य.

खालील काव्यपंक्तीतील भावसौंदर्य ६ ते ८ ओळींत स्पष्ट करा.

१) इंद्रनीळ वेळूंची बेटें
या तुझ्याच पदविन्यासखुणा

## कृती ४) रसग्रहण.

रे थांब जरा आषाढघना

रे थांब जरा आषाढघना
बघुं दे दिठि भरुन तुझी करुणा
कोमल पाचूंची हीं शेतें
प्रवाळमातीमधलीं औतें
इंद्रनील वेळूंचीं बेटें
या तुझ्याच पदविन्यासखुणा
रोमांचित ही गंध-केतकी
फुटे फुलीं ही सोनचंपकी
लाजुन या जाईच्या लेकी
तुज चोरुन बघती पुन्हापुन्हा
उघड गगन, कर घडिभर आसर
आणि खुलें कर वासरमणि-घर
वाहूं दे या तव किमयेवर
कोवळया नव्या हळदुव्या उन्हा

वरील काव्यपंक्तीचे १० ते १२ ओळींत तुमच्या शब्दांत रसग्रहण करा.

## कृती ५) व्याकरण

१) खालील शब्दांसाठी दोन समानार्थी शब्द लिहा.

१) करुणा- -------------- -----------------

२) गगन- -------------- -----------------

३) लेक- -------------- -----------------

४) किमया- -------------- -----------------

२) वरील काव्यपंक्तीतील यमक अलंकाराचे एक उदाहरण लिहा.

३) वरील काव्यपंक्तीतील सात अक्षरी शब्द ओळखून त्याचा अर्थ स्पष्ट करा..

## कृती ६) अभिव्यक्ती

' आषाढातील पाऊस ' - तुमचे अनुभव ६ ते ८ ओळींत व्यक्त करा.

# कृती संच-२

कृती १) सूचनेनुसार कृती करा.

१) आश्लेषांच्या तुषारस्नानीं
भिउन पिसोळीं थव्याथव्यांनीं
रत्नकळां उधळित माध्यान्हीं
न्हाणोत इंद्रवर्णांत वना

या काव्यपंक्तीत आलेल्या नक्षत्राचे नाव →

२) या काव्यपंक्तीतील खास गोव्याचे शब्द लिहा.

कणस भरुं दे जिवस दुधानें
देठ फुलांचा अरळ मधानें
कंठ खगांचा मधु गानानें
आणीत शहारा तृणपर्णा

आश्लेषांच्या तुषारस्नानीं
भिउन पिसोळीं थव्याथव्यांनीं
रत्नकळां उधळित माध्यान्हीं
न्हाणोत इंद्रवर्णांत वना
काळोखाचीं पीत आंसवें
पालवींत उमलतां काजवे
करुं दे मज हितगूज त्यांसवें
निरखीत जळांतिल विधुवदना

कृती २) स्वमत

१) या काव्यपंक्तींतील तुम्हांला आवडलेल्या चार ओळी सहा ते आठ ओळीत स्पष्ट करा.

कृती ३) काव्यसौंदर्य - खालील ओळींचे भावसौंदर्य ६ ते ८ ओळींत स्पष्ट करा.

काळोखाची पीत आंसवें
पालवींत उमलतां काजवे

कृती ४) रसग्रहण

कणस भरुं दे जिवस दुधानें
देठ फुलांचा अरळ मधानें
कंठ खगांचा मधु गानानें
आणीत शहारा तृणपर्णा
आश्लेषांच्या तुषारस्नानीं
भिउन पिसोळीं थव्याथव्यांनीं
रत्नकळां उधळित माध्यान्हीं
न्हाणोत इंद्रवर्णांत वना
काळोखाचीं पीत आंसवें
पालवींत उमलतां काजवे
करुं दे मज हितगूज त्यांसवें
निरखीत जळांतिल विधुवदना

वरील काव्यपंक्तीचे १० ते १२ ओळींत तुमच्या शब्दांत रसग्रहण करा.

कृती ५) व्याकरण

१) काव्यपंक्तीतील क्रियापदे शोधून लिहा.

२) खालील शब्दांसाठी विरुद्धार्थी शब्द लिहा.

१) उमलणे →

२) काळोख →

३) पादाकुलक वृत्ताची खालील ओळ सोडवून दाखवा.

पालवींत उमलतां काजवे

कृती ६) अभिव्यक्ती-

तुम्ही अनुभवलेला ' आषाढातील पाऊस ' यावर ६ ते ८ ओळींत लिहा.

# संदर्भग्रंथ

१) मराठी विश्वकोश-खंड-११

२) बोरकरांची समग्र कविता-खंड-१,२ (काँटिनेंटल प्रकाशन)

३) कवितारती-बा.भ.बोरकर विशेषांक

४) अर्वाचीन मराठी काव्यदर्शन-अक्षयकुमार काळे (पां.ना.बनहट्टी प्रकाशन)

# इतर

१) नवप्रभा-पणजी येथील वर्तमानपत्रातील आनंदयात्री बा.भ.बोरकर: काही संस्मरणे.

# क्षमता विधाने व कविता यांचा सहसंबंध

**श्रवण :-**

१) श्राव्य, दृक्-श्राव्य माध्यमांतील व्याख्याने, काव्यवाचन कार्यक्रम तसेच अभिवाचन इत्यादींमधील भाषिक वैशिष्ट्ये आणि वैचारिक बैठक बारकाईने समजून घेणे.

२) आंतरजालावरुन विविध पूरक लिंक्स्, क्यू.आर. कोड, व्हिडिओज, यू ट्यूब व प्रसारमाध्यमे इत्यादी दृक्-श्राव्य माध्यमांतून संबंधित माहिती वापरणे.

**भाषण-संभाषण :-**

१) कवितेची वैशिष्ट्ये, तिचा बाज कसा आहे यांवर चर्चा करणे.

२) कवितेचा सारांश, कवितेतील ओळींचा अर्थ सांगता येणे तसेच सादरीकरण करता येणे.

**वाचन** :-

१) विविध साहित्यकृतींचे अभिवाचन बारकाईने करणे. साहित्याचा आस्वाद घेण्यासाठी त्यात एखादी नवीन संकल्पना आहे का ते शोधणे.

२) स्वत:चे भाषाविषयक ज्ञान अद्ययावत ठेवणे. यासाठी संबंधित नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, कोशवाङ्.मय तसेच मूळ साहित्यकृतीचे सखोल वाचन करणे.

**लेखन** :-

१) कवितेतील सौंदर्याच्या विविध जागा स्पष्ट करणे.

२) नाविन्यपूर्ण अनुभव लिहिणे. तसेच स्थलकालानुरुप शब्दांचे अर्थ शोधणे.

**अध्ययन कौशल्य** :-

१) ' परंपरा व नवता ' या न्यायाने अनेक संदर्भ ग्रंथ व विविध शैक्षणिक ॲप्लिकेशन्सचा उत्तमरित्या कृतियुक्त वापर करणे गरजेचे.




पद्मश्री कविवर्य बाळकृष्ण भगवंत
बोरकर यांचा गोव्यातील पुतळा

# धन्यवाद